गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८

दैनिक

# यश सिद्धि न्यूज

RNI NO. MAHMAR/2023/84162

YASH SIDDHI NEWS

● वर्ष १ ले ● अंक ११० वा ● बुधवार ०६ सप्टेंबर २०२३ ● पाने ४ ● किंमत ४ रु/-

| * Volume 1 | Issue 110 | Date : 06 /09/2023 | blow : Wednesday | Page 4 | Price 4

# आरक्षणावर अध्यादेश काढण्यासाठी सरकारला चार दिवसांची मुदत...

## मनोज जरांगे उपोषणावर ठाम



जालना : मंत्र्यांच्या शिष्टमंडळासोबत चर्चा केल्यानंतरही मनोज जरांगे यांनी उपोषणावर ठाम राहण्याचा निर्णय जाहीर केला आहे. आंदोलन मागे घेणार नाही, पण सरकारला चार दिवसांचा वेळ देत असल्याचे शिष्टमंडळाच्या चर्चेनंतर मनोज जरांगे यांनी आपली भूमिका स्पष्ट केली आहे. मराठा आरक्षणावर अध्यादेश काढण्यासाठी आपण सरकारला चार दिवसांची मुदत देत आहोत. तोपर्यंत आपण उपोषण सुरुच ठेवणार असल्याचा निर्धारही त्यांनी व्यक्त केला आहे. शिष्टमंडळाची भेट घेतल्यानंतर मनोज जरांगे यांनी सांगितलं की, आता मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांच्याशी संपर्क होत नाही. पण त्यांच्याशी चर्चा केल्यानंतर राज्य सरकारचे हे शिष्टमंडळ उद्या पुन्हा एकदा आपली भेट घेणार आहेत आणि या प्रश्नी चर्चा करणार आहेत. एवढे मंत्री उद्या परत येऊन बोलत असतील तर नक्की काही सकारात्मक होईल.

मनोज जरांगे यांनी म्हटले की, सरकारसोबत चर्चा झाली आहे. मागील ५० वर्षांपासून मराठा आरक्षणाचा प्रश्न प्रलंबित आहे. सरकारला अहवाल द्यायचा आहे. पण आपण आंदोलन मागे घेत नाही. सरकारला आपण चार दिवसांचा आणखी वेळ दिला आहे. त्यानंतर सरकार जीआर घेऊन येतील. तोपर्यंत हे आंदोलन असेच सुरू असणार असल्याचे जरांगे यांनी म्हटले.

एक महिन्याच्या आत आरक्षणाबाबतचा अहवाल अधिकारी देणार आहे. त्यामुळे एक महिन्यात हा प्रश्न मार्गी लागणार असून, तेवढा वेळ देण्यात यावा. न्यायालयात टिकणार आरक्षण सरकराला द्यायचं आहे. काल काही माजी न्यायाधीश यांच्यासोबत चर्चा झाली असल्याचे राज्याचे मंत्री । **पान २ वर**

## राजकारण्यांकडून सत्तेचा गैरवापर करण्यात आला : शरद पवार



जळगाव : 'जालना येथील उपोषण करणाऱ्या लोकांवर लाठीहल्ला करण्यात आला. पुरुष, महिला, लहान मुले जखमी झाले. शेतकरी, शेतमजूर अनेकांवर लाठीहल्ला करण्यात आला. राजकारण्यांकडून सत्तेचा गैरवापर करण्यात आला. आय़ाबहिणींवर लाठीहल्ला करण्याची ज्यांची नीती असेल त्यांच्या हातात सत्ता ठेवणार नाही, या सगळ्यांचा आपण शंभर टक्के पराभव करू, या लढाईसाठी आपण सगळ्यांनी तयार राहिले पाहिजे, असे आवाहन राष्ट्रवादीचे नेते शरद पवार यांनी केले.

राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार ंची आज जळगाव शहरात जाहीर सभा पार पडली. या सभेच्या प्रसंगी शरद पवार बोलत होते. यावेळी त्यांनी सध्याच्या परिस्थितीला सरकारला जबाबदार धरत जोरदार निशाणा साधला. सध्या सर्वत्र दुष्काळाची स्थिती असून जळगाव जिल्हा देखील या दुष्काळाच्या छायेत आहे. सध्या राज्यभरात महागाई, बेरोजगारी असे असंख्य प्रश्न असून शेतकऱ्यासमोर अनेक प्रश्न आ वासून उभे आहेत, ही स्थिती बदलायची आहे. ही स्थिती एकदम बदलू शकत नाही. राज्यकर्ते जर आपल्या हातातील सत्तेचा योग्य वापर करतील तर ही स्थिती बदलू शकते. आज राज्य आणि केंद्राची सत्ता ज्या भाजपच्याहातामध्ये आहे, त्यांना शेतकऱ्यांच्या दुःखाबद्दल काहीच वाटत नाही. दुष्काळग्रस्तांबद्दल काहीच वाटत नाही, प्यायला पाणी नाही, त्याची चिंता वाटत नाही. टँकरने पाणीपुरवठा करण्याची वेळ आज राज्यावर आली आहे, हे सारं का आहे. तर चुकीच्या लोकांच्या हातात राज्य गेल्यामुळे हे झालं आहे, असा घणाघात। **पान २ वर**

## सात सप्टेंबरपर्यंत राज्यात मुसळधार

नागपूर : पावसाने यंदा देशभरातील अनेक राज्यांत दीर्घ कालावधीपर्यंत दडी मारली. त्यामुळे ऑगस्ट उलटूनही वातावरणातील उकाडा कायम आहे. आता महाराष्ट्रासह अनेक राज्यांमध्ये सात सप्टेंबरपर्यंत मुसळधार पावसाची शक्यता हवामान खात्याने वर्तवली आहे.

अंदमान आणि निकोबार बेटे, ओडिशा, तेलंगणा, किनारी आंध्र प्रदेशच्या काही भागांत मुसळधार पावसाची शक्यता आहे. त्याचबरोबर छत्तीसगड, पश्चिम बंगाल, तमिळनाडू, केरळच्या काही भागांत मुसळधार पावसाची शक्यता आहे. कर्नाटक, कोकण, गोवा, रायलसीमा, पुडुचेरी, कराईकल इथे मुसळधार पावसाची शक्यता आहे. उत्तर द्वीपकल्पीय भारत, ओडिशा आणि छत्तीसगडमध्ये येत्या पाच दिवसांत मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे.

६ सप्टेंबर रोजी पूर्व मध्य प्रदेश, छत्तीसगड, ओडिशा, आसाम, मेघालय, नागालँड, मणिपूर, मिझोराम, त्रिपुरा, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा, कोकण, गोवा, तेलंगणा, तमिळनाडू, केरळच्या काही भागांत मुसळधार पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. तर दुसरीकडे, कर्नाटक, किनारी आंध्र प्रदेश, यानाम, पुडुचेरी, कराईकल आणि माहे येथे पावसाची शक्यता आहे. तसेच मराठवाडा, विदर्भ, कोकण, गोवा, पुडुचेरी, कराईकल आणि माहे येथेही मुसळधार पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे.हवामान खात्याच्या अंदाजानुसार, ७ सप्टेंबरला ओडिशाच्या काही भागांत मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे. मध्य प्रदेश, छत्तीसगड, ओडिशा, आसाम, मेघालय, नागालँड, मणिपूर, मिझोराम, त्रिपुरा, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा, कोकण, गोव्याच्या काही भागांत मुसळधार पावसाची शक्यता आहे.

## शेतकऱ्यांना फायदा व्हावा अशा दृष्टीने जलसंधारणाच्या कामांचे नियोजन करावे : मुख्यमंत्री

मुंबई : शेतकऱ्यांना फायदा व्हावा, अशा दृष्टीने जलसंधारण कामांचे नियोजन करावे. तसेच लहान-मोठे प्रकल्प, धरणांतील गाळ काढण्याच्या दृष्टीने नियोजन करावे, असे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले. कोकणातील जलसंधारणाच्या कामांचे निकष व मापदंड बदलण्याच्या प्रक्रियेला गती द्यावी, असेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले.राज्यातील मृद व जलसंधारण विभागाच्या धोरणात्मक व लोककल्याणकारी योजनांच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने मुख्यमंत्री श्री. शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. सह्याद्री राज्य अतिथीगृह येथे झालेल्या बैठकीस महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड यांच्यासह महसूल विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव राजगोपाल देवरा, वित्त विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव डॉ. नितीन करीर, जलसंपदा विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव दीपक कपूर, मृद व जलसंधारण विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले, नियोजन विभागाचे प्रधान सचिव सौरव विजय आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, पावसाचा प्रत्येक थेंब अडवता आला



पाहिजे. अशा कामांना प्राधान्य द्यावे लागेल. यासाठी आतापर्यंत झालेल्या कामांतून काय बदल घडला यांचेही मूल्यांकन करणे आवश्यक आहे. नव्याने हाती घ्यायच्या कामांबाबत सर्वेक्षणही करण्यात यावे. जेणेकरून या कामांची उपयुक्तता वाढेल.

कोकणात भरपूर पाऊस पडतो. पण ऐन उन्हाळ्यात हा परिसर कोरडा होतो, याकडे लक्ष वेधून मुख्यमंत्री म्हणाले की, कोकणात जलसंधारणाची अनेक कामे करता येतील. या कामांसाठी जुने निकष आणि मापदंड बदलण्याची आवश्यकता आहे. त्यादृष्टीने सुरू झालेल्या कामांना गती देण्यात यावी. या कामांमुळे कोकणातील चित्र बदलू शकते. एकात्मिक अशा पद्धतीनं या परिसरातील जलसंधारणाच्या कामांकडे पहावे लागेल. कोकणातील भौगोलिक परिस्थिती वेगळी आहे. त्यादृष्टीने जलसंधारणाच्या उपाययोजनांचा विचार करावा लागेल, असेही मुख्यमंत्री म्हणाले. यावेळी झालेल्या चर्चेतून पुढे आलेल्या विविध पर्यायांचा विचार करण्याची तसेच त्यांची व्यवहार्यता तपासण्याच्या सूचना करण्यात आल्या.

जलयुक्त शिवार अभियानाच्या पहिल्या टप्प्यात लहान प्रकल्प, तलावातील गाळ मुक्त मोहिमेला गती देण्यात आली होती. त्याची माहिती बैठकीत देण्यात आली. त्यावर मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी कोयना धरणात मोठ्या प्रमाणात गाळ साचून त्याची धारण क्षमता कमी झाल्याकडे लक्ष वेधले. । **पान २ वर**

## शेतीमध्ये नॅनो खताचा वापर वाढवा : डी.एस.गावसाने

सोलापूर/प्रतिनिधीः रासायनिक खताचा संतुलित वापर करून नॅनो खतांचा वापर वाढवा. रासायनिक खतांचा वापर करण्यासाठी सर्वप्रथम जमिनीचे माती परीक्षण करून घेऊन शास्त्रीय दृष्टिकोनातून आवश्यक असणाऱ्या मूल घटकांच्या पूर्तीसाठी रासायनिक खतांचा संतुलित वापर करून नॅनो खताचा वापर वाढवा. तसेच पिकांची उत्पादकता वाढण्यासाठी शेणखत, कंपोस्ट खत व जैविक खतांचा वापर करावा, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी डी.एस. गावसाने यांनी केले आहे.सरकारने नॅनो खते-नॅनो युरिया (द्रवरूप) व नॅनो डीएपी (द्रवरूप) नवीन संशोधनाद्वारे शेतकऱ्यांसाठी उपलब्ध करून दिले आहे. नॅनो युरिया व नॅनो डीएपी द्रवरूप हे ५०० मिली पॅकिंगमध्ये असून, नॅनो युरियामध्ये ४ टक्के नत्राचे प्रमाण तसेच नॅनो डीएपीमध्ये ८ टक्के नत्र व १६ टक्के स्फूरद एकूण वजनाच्या प्रमाणात असते. नॅनो युरिया व डीएपीद्वारे पिकांना नत्र व स्फुरद फवारणीच्या माध्यमातून उपलब्ध होते. नॅनो खतांची फवारणी केल्यानंतर नत्र व स्फुरद झाडाच्या पानावरील, बिया व मुळाच्या पृष्ठभागावर असणाऱ्या छिद्रांच्या माध्यमातून आतमध्ये प्रवेश करते व पानांच्या पेशींमधील पोकळीमध्ये । **पान २ वर**

**नॅनो खते- नॅनो युरिया (द्रवरूप) व नॅनो डीएपी (द्रवरूप) चा वापर** ✻ पिकांच्या विविध अवस्थेत दोन वेळा फवारणी करून नत्र व स्फुरद या अन्न घटकांची पिकांना पूर्तता करून देणे शक्य आहे. ✻ दोन ते पाच मिली लिटर नॅनो खते प्रति लिटर पाण्यामध्ये मिसळून पिकाच्या प्रमुख वाढीच्या अवस्थेनुसार फवारणी करावी. ✻ नॅनो खतांच्या उत्तम परिणामासाठी पहिली फवारणी पिकाच्या फुटवे, फांद्या फुटण्याच्या अवस्थेमध्ये व दुसरी फवारणी पिकाच्या फुलोरा, शेंगा लागणे ७ ते १० दिवस अगोदर करावी ✻ फवारणी सकाळच्या वेळेत कमी उन्हामध्ये आणि हवेच्या कमी वेगामध्ये करावी. ✻पाने पूर्ण ओली होण्यासाठी आणि नॅनो खते समप्रमाणात सर्वत्र मिसळण्यासाठी पंपाला फ्लॅट फॅन किंवा कट नोझल लावून फवारणी करावी.✻ नॅनो युरीया व डिएपी फवारणीव्दारे देण्यात यावे, ठिबक व वाहत्या पाण्यातुन देण्यात येवू नये.

## गणेशोत्सव स्पर्धेत सहभागी होणाऱ्या गणेशोत्सव मंडळांनी १५ सप्टेंबरपर्यंत सहभाग नोंदवावा

सोलापूर/प्रतिनिधीः राज्य शासनाने १९ सप्टेंबर २०२३ पासून सुरू होणाऱ्या गणेशोत्सवात राज्यातील उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना पुरस्कार देण्याचा निर्णय घेतला आहे. या स्पर्धेत जिल्ह्यातील जास्तीत जास्त मंडळांनी १५ सप्टेंबर २०२३ पर्यंत सहभाग नोंदवावा असे आवाहन जिल्हा नियोजन अधिकारी दिलीप पवार यांनी केले आहे.उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव स्पर्धेत सहभागी होण्यासाठी गणेश मंडळांना १५ सप्टेंबर २०२३ पर्यंत स्पर्धेत अर्ज करता येईल. ारहीीर्री.श्रिवर.साराळश्र.लो या ई - मेलवर गणेशमंडळांनी अर्ज करावा. पु. ल. देशपांडे कला अकादमी तर्फे ई-मेलवर प्राप्त अर्ज जिल्हाधिकारी कार्यालयाला परीक्षणासाठी उपलब्ध करून देण्यात येईल. जिल्हास्तरीय समितीचे सदस्य स्पर्धेत सहभागी गणेशोत्सव मंडळांचे प्रत्यक्ष भेटी देऊन परीक्षण करतील. व्हिडिओग्राफी आणि कागदपत्रे तपासून अभिप्रायासह गुणांकन करतील. जिल्हास्तरीय समिती जिल्ह्यातून एका उत्कृष्ट गणेश मंडळाची शिफारस पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमीला करेल. राज्यस्तरीय समिती राज्यातील उत्कृष्ट ३ गणेश मंडळाची शिफारस अकादमीला करेल. त्यानुसार कला अकादमी विजेत्या मंडळांची घोषणा करेल व विजेत्या गणेश मंडळांना पुरस्कार प्रदान करण्यात येईल. राज्य शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावरील पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाच्या ४ जुलै २०२३ रोजीच्या शासन निर्णयात स्पर्धेचा तपशील, स्पर्धा निवडीचे निकष नमूद केले आहेत. तसेच अर्जही उपलब्ध करून देण्यात आला आहे. अर्जाच्या या नमुन्यानुसार सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनी पु. ल. देशपांडे, महाराष्ट्र कला अकादमी, मुंबई यांच्या mahotsav.pldagmail.com या ई- मेल १५ सप्टेंबर २०२३ पर्यंत अर्ज करावा. या स्पर्धेत जास्तीत जास्त मंडळांनी सहभाग नोंदवावा, असेही आवाहन जिल्हा नियोजन अधिकारी पवार यांनी केलेआहे.

## गोगांव जिल्हा परिषद शाळेत शिक्षक दिन साजरा



अक्कलकोट/प्रतिनिधी : गोगांव येथे जिल्हा परिषद शाळेत शिक्षक दिनानिमित्त अक्कलकोट समतादूत नालंदा चंदनशिवे मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली संविधान जागर अभियान मोहीम राबविण्यात आले, या वेळी शिक्षण महर्षी भारतरत्न, डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेचे पूजा कार्यक्रमाचे अध्यक्ष उपसरपंच कमलाकर सोनकांबळे यांच्या हस्ते करण्यात आले, या मार्गदर्शन करताना समतादुत म्हणाले की, मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शालेय शैक्षणिक बाबत व इतर सेवासुविधा समाज कल्याण विभाग मार्फत योग्य मार्गदर्शन केले जाईल, व विद्यार्थ्यांना शैक्षणिक सवलतीचा फायदा होईल असे मत व्यक्त समतादूत नालंदा चंदनशिवे मॅडम यांनी केले. तसेच उपसरपंच कमलाकर सोनकांबळे यांनी देखील शालेय विद्यार्थ्यांना व शिक्षक दिनाच्या निमित्ताने शुभेच्छा दिले व प्रमुख पाहुणे चंदनशिवे मॅडम यांचे शाल श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आले, या प्रसंगी शिक्षक महादेव चव्हाण, पुंडलिक वाघमारे सर, ज्योती आलुरे मॅडम, विजयकुमार गायकवाड, नितीन गायकवाड आदी उपस्थित होते तर सुत्रसंचलन व आभार व्यक्त शाळेचे मुख्याध्यापक श्री दयाऩद चोळळे यांनी केले..

### शासकीय वैद्यकीय महाविद्यालयास

## कर्णबधिरत्व तपासणीसाठी आवश्यक असलेली बेरा टेस्ट मशीन मिळाली



सोलापूर/प्रतिनिधी : समाज कल्याण विभाग जिल्हा परिषद सोलापूर व जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने कर्णबधिर व्यक्तींचे कर्णबधिरत्व तपासण्यासाठी अत्यंत आवश्यक असलेले बेरा टेस्ट मशीन मुख्य कार्यकारी अधिकारी मनीषा आव्हाळे यांचे हस्ते वैशपंयन शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठता डॉ. सुधीर देशमुख यांच्याकडे सुपूर्द करण्यात आली.

मागील एक वर्षापासून जिल्हा रुग्णालयात बेरा टेस्ट मशीन नसल्यामुळे दिव्यांग व्यक्तींचे कर्णबधिरत्व तपासता येत नव्हते. दिव्यांग विभाग दिव्यांगाच्या दारी हे अभियान राबविण्यासाठी घेण्यात आलेल्या बैठकीमध्ये ही बाब जिल्हा समाज कल्याण अधिकारी सुनील खमीतकर यांचे निर्दर्शनास आल्यामुळे त्यांनी दिव्यांग पुनर्वसन केंद्राचे अध्यक्ष प्रकाश येलगुलवार यांच्याशी चर्चा करून ही बेरा टेस्ट मशीन उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. । **पान २ वर**

## ✻ सुविचार ✻

समोर अंधार दिसत असला तरीही त्यापलीकडे उजेड आहे हे लक्षात ठेवा.

# संपादकीय

## प्रश्न निकाली काढावे...

मोर्चा, निदर्शने, आंदोलन म्हटले की, त्याला हिंसक वळण हे ठरलेलेच असते. परंतु, मराठा आरक्षणासाठी निघालेले मोर्चे हे अपवाद ठरले होते. लाखोंच्या संख्येने समाज एकत्रित आला असतानाही साधी एखादी दगड एखाद्या वाहनावर अथवा दुकानावर पडल्याची नोंद कुठेही झाली नव्हती. इतिहासामध्ये त्यांच्या विराट मोर्चाची नोंद कायम राहील. मात्र, जालना जिल्ह्यातील अंतरवाली सराटी येथे मनोज जरांगे-पाटील यांच्या नेतृत्वाखाली सुरू असलेल्या आंदोलनास लागलेले गालबोट महाराष्ट्राच्या अशांततेला कारणीभूत ठरले. सरकार आणि पोलीस यंत्रणा येथील आंदोलन व्यवस्थितपणे हाताळण्यास अपयशी ठरले. आंदोलनकर्त्यांनी केलेली दगडफेक त्यानंतर पोलिसांकडून लाठीमार व गोळीबाराच्या घटनेमुळे जनक्षोभ उसळला. मराठा समाजाने राज्यभरात रस्त्यावर उतरून जनजीवन विस्कळीत करून टाकले. सरकारविरोधात असलेल्या संतापाला त्यांनी वाट करून मोकळी करून दिली. ठिकठिकाणी दगडफेक, जाळपोळीमुळे वातावरण अशांत बनले. मराठवाड्यातील परिस्थिती स्फोटक बनली असून त्याचे चटके महाराष्ट्रातील लोकांना बसू लागले आहेत. घटना घडल्याच्या तीन दिवसांनंतर सरकारला जाग आली. जालन्याचे पोलीस अधीक्षक तुषार दोशी यांना सक्तीच्या रजेवर पाठवले. मात्र, मराठा समाज त्यावर समाधानी नसून लाठीमाराचे आदेश दिलेल्या संबंधित पोलीस अधिकाऱ्यांना निलंबित करा आणि मराठा आरक्षणाचा निर्णय तत्काळ घ्यावा, यावर ते ठाम आहेत. जोपर्यंत निर्णय होत नाही तोपर्यंत आंदोलन चालू राहील, अशी भूमिका सकल मराठा समाजाने घेतली आहे. त्याला अन्य राजकीय पक्ष आणि विविध समाज घटकांनी पाठिंबा दर्शविला आहे. मराठा समाजाला आरक्षण देण्याचा निर्णय देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली सरकारने घेतला आहे. मात्र, महाविकास आघाडी सरकारच्या काळात कायदेशीर स्तरावर न्यायालयात ते टिकू शकले नाही. त्यावरून एकमेकांवर राजकीय चिखलफेक झाली. आरक्षणाचा मुद्दा बाजूला राहिला. आता त्यावरून नुसतेच राजकारण चालू आहे. एखादा विषय अनेक वर्षे निर्णयाविना रखडत ठेवणे हे योग्य नाही. त्यासाठी राज्य सरकारने केंद्र सरकारच्या माध्यमातून मराठा समाजाला आरक्षण देण्यासाठी कायदा करण्यास भाग पाडावे, केंद्रात आणि राज्यात एकाच विचाराचे सध्या सरकार असल्यामुळे हा प्रश्न शक्य तितक्या लवकर निकाली काढणे आवश्यक आहे.

## लढले हक्कासाठी तर मिळेल लाठी...

भारताचा इतिहास हा लोभी स्वार्थी व नितीहीन लोकांचे वर्चस्व कायम रहावे म्हणून माणसा माणसा भेद करून विषमता व जातीवाद वाढवून, त्यांना कोणतेही हक्क अधिकार न देता केवळ अंधविश्वास व धर्माच्या नावाखाली गुलाम बनवून पाखंडाच्या माध्यमातून अनेक धुर्त लोकांनी भारतीय लोकांचे आर्थिक, मानसिक शोषण करून आपले वर्चस्व प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला. स्वतःला च श्रेष्ठ समजून इतरांना कनिष्ठ समजणाऱ्यांची किती घान माणसिकता असेल हे लक्षात येते. इतरांना दुय्यम समजणारी माणसिकता नैतिक दृष्टीने व न्यायीक दृष्टीने कधीच न्यायीक नसते. अन्याय अत्याचार, दिशाभूल करून, अज्ञान, अंधविश्वास यांच्या माध्यमातून लोकांना कमकुवत करण्यात ज्यांना सामर्थ्य वाटते तेच खरे भ्याड लोक असतात. आणि बहुसंख्य ताकदवान लोक धर्म, अंधविश्वास व पाखंड यांच्या यामुळे माणसिक गुलाम झाले म्हणून भ्याड लोक आजही गुलामांचे सरदार आहेत हिच बाब लोकांना कळत नाही. ज्यांना हि बाब कळाली, म्हणुन जे लोक अंधविश्वास, पाखंड, विषमता, भोंदुगीरी नितीहीन लोकांचे वर्चस्व लाथाडून समता बंधुता न्याय व स्वातंत्र्यावर बोलताना त्या लोकांना पुरोगामी म्हणून हिनवले जाते. आणि हेच हिनवणे हिणवणारा किती माणसिक गुलाम असून तो विषमता वादी पिळावळीची किती लाचारी करतो हे सिद्ध होते. शिक्षण नाही, नोकरी नाही, विकासाच्या व समतेच्या संधी नाहीत, केवळ भोंदु आणि पाखंडी लोकांनी सांगितले तेच अंतिम सत्य माणुन जगायाचे अशा खितपत पडलेल्या माणवाच्या जिवनाला फुलें शाहु आंबेडकर यांनी सोन्याचे रुप दिले परंतु आजही विषमता, भोंदुगीरी पांखड, फसवेगिरी, अंधविश्वास च्या माध्यमातून मिळालेली गुलामीच चांगली वाटते पण शिक्षण, आरक्षण, समान संधी समता, बंधुतेच्या माध्यमातून दिलेले माणसिक व शारिरीक स्वातंत्र्य आणि हक्क अधिकार देणारे महापुरुष पचत नाहीत याचे कारणच आहे ते म्हणजे माणसिक गुलामी. जोपर्यंत व्यक्तीला फुले शाहु आंबेडकर आंदोलन कळणार नाही तो पर्यंत प्रत्येक जण गुलाम म्हणुनच जिवन जगेल. ज्यांना फुले शाहु आंबेडकर आंदोलन कळाले ते लोक स्वाभिमानी व समतावादी बनुन अन्याय अत्याचारा विरोधात ठाम पणे उभे राहून आदर्श राष्ट्राची संकल्पना मांडतात. ज्यांना फुले शाहु आंबेडकर आंदोलन कळाले नाही ते मात्र विषमता, अंधविश्वास, पाखंड भोंदुगीरी, धर्माच्या माध्यमातून आजही गुलामच आहेत. आणि गुलाम मालका सोबत प्रामाणिक असतात म्हणून ते कधीच बंड वा आंदोलन करत नसतात. तर मालकाने सांगितलेले काम चोक करत असतात. प्रत्येक वेळी हि पार्श्वभूमी सांगणे अत्यंत आवश्यक आहे. कारण पार्श्वभूमीच कळाली नाही तर सद्य परिस्थिती कळणार नाही. हजारो वर्षापासून अज्ञान, हक्क, अधिकार, शिक्षण व विकासासाच्या संधी का नाकारल्या गेल्या याचे उत्तर शोधले आणि समजून घेतले तर धुर्त लोकांचे वर्चस्व कायम रहावे म्हणून लोकांना ह्या गोष्टी नाकारण्यात आल्या. फुले शाहु आंबेडकर चळवळीचे संरक्षीत व प्रभावी स्वरूप म्हणजे भारतीय राज्यघटना. हजारो वर्षांपासूनची गुलामी, अज्ञान, विषमता, एकाच झटक्यात नेस्तनाबूत करून स्वातंत्र्य, शिक्षण, समता, हक्क अधिकार व सर्वांना समान संधी निर्माण करून हजारो वर्षांपासून चालत आलेल्या धुर्त लोकांच्या हीताची विषमता वादी शोषणवादी व्यवस्था उलथून पाडली. हिच बाब आजही जिवंत असलेल्या धुर्त व नितीहीन लोकांना खटकत आहेत. आजही त्यांना भारतीय संविधान व संविधानाच्या माध्यमातून लोकांचा झालेला सर्वांगीण विकास व स्वाभिमान आणि हक्क अधिकाराप्रती जागृत झालेले लोक सहन होत नाहीत. याचे अनेक उदाहरणे आहेत. परंतु अनेक जन आजही गुलामीचा चष्मा उतरवायला तयार नाहीत. म्हणून आजही धुर्त लोक त्यांचा अजेंडा पुर्ण करताना दिसुन येतात.

स्वार्थी आणि पाखंडी लोकांना आपणलेच वर्चस्व कायम असावे व इतरांनी गुलामी करावी एवढेच वाटते म्हणून गुलामांना मालका प्रमाणे राहता येत नाही गुलाम आणि मालक यांच्या मध्ये फरक असतो. आणि हाच फरक दुर करून संविधानाचे सर्वांनाच मालक केले हिच बाब दुर्तांना सहन होत नाही म्हणून त्यांच्या कुरापती सुरू असतात. सत्य बोलणारा, लोकांना जागृत करणारा, हक्क अधिकार मागणारा यांच्या वर कारवाई केली जाते लाठीचार्ज केला जातो. केंद्रात व राज्यात हिंदुत्ववादी सरकार आहे. धर्माच्या नावाचा वापर मत मागताना किंवा राजकारण करताना करता येत नाही असे सर्वोच्च न्यायालयचे जजमेंट असताना ही धर्माच्या नावाचा वापर केला जातो. जे लोक सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाचे पालन करत नाहीत ते लोक सर्वसामान्य लोकांचे भले करतील हे बैलासमोर दुधाची बाटली घेऊन दुध देण्याची अपेक्षा करण्या सारखेच आहे. हिंदुचे सरकार हिंदुच्या हिताचे काम करण्यासाठी तयार केले केले. परंतु हिंदू कोणाला म्हणायचे हे अजूनही कोणालाच कळाले नाही. आणि एक सरळ सरळ नियम असतो. राजा आपल्याच प्रजेवर कधीच अन्याय अत्याचार करत नसतो. सांगण्याचा उद्देश हा आहे की हिंदुत्वाच्या नावाखाली सरकार तयार झाले आणि वारकऱ्यांवर लाठीचार्ज केला. जे वारकरी समता बंधुता नांदावी भेदभाव नष्ट होऊन संताच्या विचारावर आधारित व्यवस्था निर्माण व्हावी त्या वारकऱ्यांवर लाठीचार्ज केला जातो आणि सरकार प्रकरण दाबुन टाकते. याचाच अर्थ वारकरी हिंदु नाहीत. कारण सरकार हिंदुचे आहे आणि हिंदू च हिंदुवर लाठीचार्ज करूच शकणार नाही. दुसरी महत्त्वाची गोष्ट जी जालना येथे घडली संविधानीक मार्गाने हक्क अधिकार माघण्यासाठी मराठा समाज रस्त्यावर उतरला त्यांच्या मागण्या मान्य न करता त्यांच्या वर लाठीचार्ज करून सरकारने हे दाखवून दिले की सरकार ज्या हिंदुसाठी बनले त्यामध्ये मराठा समाज येतच नाही. जर मराठा समाज हिंदु असता तर हिंदुच्या सरकारने हिंदुवर लाठीचार्ज का केला असता. बर दुसरी बाब बघा जनतेला किती मुर्ख बनवले जाते. ज्यावेळी आताचे गृहमंत्री विरोधी पक्षात होते तेंव्हा ते सांगत होते आमचे सरकार आले तर आम्ही मराठा आरक्षण देऊ. जे कँमेऱ्या समोर सांगायचे मराठा आरक्षण देता येते पण आम्ही सत्ते मध्ये पाहिजे. आता ते सत्तेमध्ये आहेत आणि मराठा आरक्षणाची मागणी होत असताना आंदोलकांवर लाठीचार्ज करून आंदोलन दडपून टाकले जाते. याचा अर्थ सरकार हे मराठा समाजाच्या हिताचे नाही. हिंदु व हिंदुत्वाशी अनेक लोक भावनिक आहेत. हिंदु धर्माच्या चुकिच्या बाबींवर कोणी सत्य बोलले तर धर्म धोक्यात येतो म्हणणारे, हिंदु धर्मासाठी काही ही करतो म्हणणारे, हिंदू बद्दल एकही शब्द ऐकुन घेणार नाही अशी धमकी देणारे, स्वतः ला हिंदुत्ववादी संघटनेचे कार्यकर्ते पदाधिकारी समजणारे लोक वारकरी व मराठा बांधवांवर लाठीचार्ज होतो तेव्हा एकही शब्द बोलत नाहीत. तेव्हा समजून घ्यायला पाहिजे कि सत्तेतील हिंदु हे वेगळ्या लोकांसाठी आहे आणि सर्वसामान्य लोकांचे हिंदुत्व फक्त समाजात दुफळी निर्माण करून मताची झोळी भरण्यासाठी आहे. वारकरी लाठीचार्ज, मराठा आंदोलकांवर लाठीचार्ज या वेळी कोणत्याही हिंदु आमदार खासदार यांच्या भावना दुखल्या नाहीत कोणी ही आमच्या लोकांवर लाठीचार्ज झाला म्हणून राजीनामा दिला नाही. हि गोष्ट समजून घेणे महत्त्वाचे आहे. जोपर्यंत हि बाब कळणार नाही तोपर्यंत व्यवस्था कळणार नाही. मार खाणारे आणि मारणारे यांचा धर्म कधीच एक नसतो. देणारे आणि माघणारे यांचा धर्म कधीच एक नसतो. आणि सर्वात महत्वाचे म्हणजे राजा माघत नसतो तर देत असतो. काही भक्त लोकांना वाटत असेल की आमच्या जातीचे लोक आमदार खासदार आहेत म्हणून आम्हाला काही मिळेल. आमदार खासदार असणे म्हणजे सत्ता मुळीच नाही. आपल्या लोकांना काही देण्याचा अधिकार म्हणजे सत्ता असते. मराठा समाज आरक्षण माघत आहे म्हणजेच देणारे मराठा लोक नाहीत. जर मराठा लोकांना देण्याचे अधिकार असते तर आमदार खासदार भरपूर आहेत तरीही ते देऊ शकत नाहीत. याचाच अर्थ मराठा समाज हा सत्तेमध्ये नाही. हक्क माणणाऱ्याला लाठीचा मार दिला जातो व मनोहर कुलकर्णी देशाचा ध्वज, राष्ट्रगीत नाकारून महात्मा फुलेंबद्दल वादग्रस्त विधान करून गांधी यांच्या वडीलांबद्दल संशय घेऊन इतिहासाचे विद्रुपीकरण करतो तर त्याला पोलीस संरक्षण दिले जाते. कुरूलकर देशाची गुप्त माहिती पाकिस्तान या शत्रु राष्ट्राला देतो तरीही त्यांच्या वर राष्ट्रद्रोहाचा खटला भरला जात नाही. संविधानीक मार्गाने शासकीय शिक्षण व नोकरी मध्ये आरक्षण मागीतले तर मार मिळतो. जर मराठा समाजाने हिंदुच्या मंदिरात पुजाऱ्या साठी आरक्षण मागितले तर काय होईल याचा विचार करा. आणि मंदिरात आरक्षण मागितले तर खरे कळेल नेमके हिंदुत्व व हिंदु यांचा वापर कोणासाठी होत आहे. अंधविश्वास पसरवणाऱ्या भोंदुच्या कार्यकर्माला लाखो लोक आले तर लाठीचार्ज होत नाही, देशद्रोह्यावर होत नाही. पण हक्क अधिकार मागून विकासाची संधी मागीतली तर मात्र मार बसणारच. येथे मराठा समाजाचेच नाही तर माणसाचे हक्क अधिकार धोक्यात आहेत. माणसाला व माणसाच्या हिताच्या लोकशाही ला वाचवायचे असेल तर जाती धर्माचा विचार न करता केवळ मानवहीता साठी सर्वांनी एकत्र येऊन ईव्हीएम ला विरोध करून बँलटपेपर वर निवडणुक घेण्याची मागणी यशस्वी करावी. तरच लोकशाही व लोकांचे हक्क अधिकार वाचतील व कोणावरही अन्याय अत्याचार होणार नाहीत व समता बंधुता न्याय आधारित समाज व्यवस्था कायम राहील.

**-विनोद पंजाबराव सदावर्ते**
**समाज एकता अभियान**
**मोबा: ९१३०९७९३००**

पान १ वरुन

## आरक्षणावर अध्यादेश काढण्यासाठी

गिरीश महाजन यांनी सांगितले. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज चर्चा करण्यासाठी आम्हाला पाठवले आहेत. येथे आल्यावर आम्हाला वाटलं मनोज दरांगे आमचं ऐकतील. पण आम्हाला दरांगे यांच्या तब्येतीची काळजी आहे. आम्ही आता शब्द दिला आहे. झालं तर आरक्षणाचं काम १० दिवसांत होईल. सरकार सकारात्मक आहे. मागच्या वेळी आम्ही आरक्षण दिलं होतं, ते न्यायालयात पण टिकले. आता तो विषय सोडून घ्या. पहिल्यांदा माफी मागितली असल्याचं गिरीष महाजन यांनी म्हटले.

सरकारचं शिष्टमंडळ अंतरवाली सराटी गावात पोहचले आज सायंकाळच्या सुमारास पोहचले. यावेळी गिरीश महाजन ,आणि अर्जुन खोतकर यांनी अमोल मनोज जरांगे यांची भेट त्यांच्यासोबत चर्चा केली. तसेच यावेळी सरकारची भूमिका त्यांना सांगितली. यावेळी उपोषण स्थळी मोठ्या प्रमाणात गर्दी होती. तर जरांगे यांच्या प्रकृती पाहता त्यांनी उपोषण मागे घेतलं पाहिजे, सरकार आरक्षणाच्या बाबतीत सकारात्मक असून एक महिन्याच्या वेळ देण्याची मागणी महाजन यांच्याकडून करण्यात आली. पण आम्हाला आरक्षण हवं आहे, मराठवाड्यातील मराठ्यांनी काय केलं? असा प्रश्न मनोज जरांगे यांनी यावेळी महाजन यांना विचारला. गिरीष महाजन चर्चा करत असतानाच काही कार्यकर्त्यांनी अचानक घोषणाबाजी देण्यास सुरुवात केली. मात्र यावेळी मनोज जरांगेंनी यांनी कार्यकर्त्यांना थांबवलं. संपूर्ण आयुष्य आपलं घोषणाबाजी करण्यात गेलं आहे. त्यामुळे आता आपल्याला आरक्षण हवं आहे. फक्त घोषणाबाजी करून काय करणार. सराकरचं शिष्टमंडळ आले असून, त्यांच्यासोबत चर्चा करू असे म्हणत त्यांनी घोषणाबाजी थांबवली.

## राजकारण्यांकडून सत्तेचा गैरवापर ..

शरद पवार यांनी केला. शरद पवार पुढे म्हणाले की, यवतमाळ जिल्ह्यात गेल्या आठवड्यात तब्बल १८ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याच्या घटना. शेतकऱ्यांच्या आत्महत्या का थांबू शकत नाहीत? शेतकरी आत्महत्या का करत आहे, याचा तपास राज्य सरकारने करणं महत्त्वाचं आहे १९८४-८५ मध्ये जळगाव ते नागपूर दिंडी काढण्यात आली. पहिल्या दिवशी हजार लोक होते. दुसऱ्या दिवशी २५,००० लोक झाले. तिसऱ्या दिवशी ५० हजार लोक जमा झाले. चौथ्या दिवशी एक लाख लोक जमा झाले आणि नागपूरपर्यंत लाखोंचा जत्था या दिंडीत सहभागी होता. त्यामुळे शेतकरी, सामान्य नागरिक यांचं राजकारणात महत्वाचं स्थान असतं. त्याला कुठलीही ठेच पोहोचता कामा नये, असे आवाहन शरद पवार यांनी केले.

## शेतकऱ्यांना फायदा व्हावा अशा..

ते म्हणाले की, येत्या उन्हाळ्यात अशा गाळांनी भरलेले जलसाठे, जलस्रोत, नद्या, ओढे-नाले यांना गाळमुक्त करण्यावर लक्ष केंद्रीत करावे लागेल. मोठ्या प्रकल्पातून अन्य राज्यांच्या वाट्याचे पाणी सोडल्यानंतर आपल्यासाठी पुरेसा जलसाठा उपलब्ध व्हावा यासाठी या धरणांतील गाळ काढावा लागेल. त्यासाठी वेळेत सर्वेक्षण आणि नियोजन करावे लागेल. नद्या-नाले यांच्या खोलीकरणावर भर द्यावा लागेल, असेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले. यावेळी केंद्र सरकारच्या ड्रेजिंग कार्पोरेशन ऑफ इंडिया सारख्या यांत्रिकीदृष्ट्या सक्षम यंत्रणाची मदत घेण्याबाबतही चर्चा झाली. या चर्चेत मंत्री विखे-पाटील, राठोड आदींनी सहभाग घेतला.

## शेतीमध्ये नॅनो खताचा वापर

साठवले जाऊन पिकांच्या आवश्यकतेनुसार झाडाला उपलब्ध होते. त्यामुळे नत्र व स्फूरद ही अन्नद्रव्ये विहित वेळेत योग्य त्या प्रमाणात पिकांना (८६ टक्के) उपलब्ध होतात. या नॅनो पद्धतीमुळे खतांचा संतुलित वापर होऊन जमीन हवा व पाणी या मूलभूत घटकांना प्रदूषण मुक्त ठेवता येते. लागवडीच्या खर्चात बचत होते व पिकांच्या भरघोस उत्पन्नाची हमी प्राप्त होते. असेही जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी गावसाने यांनी सांगितले आहे.

## कर्णबधिरत्व तपासणीसाठी आवश्यक

सोलापूर जिल्ह्यातील सर्व कर्णबधीर दिव्यांगांच्या तपासणीसाठी उपयोगी व्हावी व कर्णबधिर बांधवांना यु.डी.आय.डी. कार्ड व ऑनलाईन वैद्यकीय प्रमाणपत्र मिळण्यासाठी पुढाकार घेऊन सदर मशीन मुख्य कार्यकारी अधिकारी मनीषा आव्हाळे यांच्या हस्ते वैद्यकीय अधिष्ठाता यांचेकडे सुपूर्द केली. जिल्हा समाज कल्याण अधिकारी सुनील खमितकर, जिल्हा दिव्यांग पुनर्वसन संस्थेचे सचिव शशी भूषण, सहसचिव शिवाजी जाधव, दिव्यांग विभाग प्रमुख सच्चिदानंद बांगर तसेच तसेच राजकुमार पाटील, रामचंद्र कुलकर्णी उपस्थित होते.

# क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले राज्य शिक्षक गुणगौरव पुरस्कार प्रदान

मुंबई : विद्यार्थ्यांच्या जीवनाला आकार देण्याचे, तरूण पिढी आणि देश घडविण्याचे काम शिक्षक करीत असतात. त्यांच्या अडचणी सोडविण्याचे शासनाचे धोरण असून शिक्षकांवरील अशैक्षणिक कामांची जबाबदारी कमी करण्यासाठी समिती नेमण्यात आली आहे. या समितीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर याबाबत निर्णय घेण्यात येईल, असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले.सन २०२२-२३ च्या क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले राज्य शिक्षक गुणगौरव पुरस्कारासाठी शासनाने शालेय शिक्षण स्तरावर प्रवर्गनिहाय १०८ शिक्षकांची निवड केली आहे. या शिक्षकांना ५ सप्टेंबर या शिक्षक दिनाचे औचित्य साधून मुंबईत झालेल्या कार्यक्रमात मुख्यमंत्री श्री.शिंदे यांच्याहस्ते सहकुटुंब गौरविण्यात आले. यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार, विधानसभा अध्यक्ष ड. राहुल नार्वेकर, शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर, शिक्षक आमदार सर्वश्री कपिल पाटील, विक्रम काळे, किरण सरनाईक, शालेय शिक्षण विभागाचे प्रधान सचिव रनजितसिंह देओल, शिक्षण आयुक्त सूरज मांढरे यांच्यासह पुरस्कार विजेते शिक्षक आणि त्यांचे कुटुंबीय उपस्थित होते.

समाजाची निःस्वार्थ भावनेने आणि निष्ठेने सेवा करणाऱ्या व शैक्षणिक क्षेत्रात उत्कृष्ट काम करणाऱ्या शिक्षकांना त्यांच्या अंगीकृत कामात प्रोत्साहन देण्याच्या व त्यांच्या गुणांचा यथोचित सन्मान करण्याच्या उद्देशाने राज्य आदर्श शिक्षक पुरस्कार जाहीर करण्यात येतात. सन २०२१-२२ पासून राज्य आदर्श शिक्षक पुरस्काराचे निकष सुधारीत करून सदर पुरस्कार क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले राज्य शिक्षक गुणगौरव पुरस्कार या नावाने देण्यात येत आहेत. एक लाख दहा हजार रूपये, सन्मानचिन्ह आणि प्रमाणपत्र असे पुरस्काराचे स्वरूप आहे.

पुरस्कार प्राप्त शिक्षकांच्या कार्याचा गौरव करून मुख्यमंत्री श्री.शिंदे म्हणाले, राज्य शासन शिक्षण क्षेत्राचा दर्जा उंचावण्यासाठी नवनवीन योजना आणि उपक्रम राबवित आहे. शिक्षक हा यातील महत्त्वाचा घटक आहे. ते ज्ञानदानाचे कार्य करीत असल्याने पालकांनंतर गुरूजनांना महत्व दिले जाते. शिक्षण क्षेत्रात आमूलाग्र बदल घडविण्याचे शासनाचे ध्येय असून शिक्षणाचे महत्त्व जोपासण्यासाठी शासनामार्फत आवश्यक तो निधी उपलब्ध करून दिला जात आहे. शिक्षकांनी चांगले विद्यार्थी घडवून यात अधिक योगदान देण्याची अपेक्षा त्यांनी यावेळी व्यक्त केली. केंद्र सरकारचे राज्याला पाठबळ असून त्या माध्यमातून राज्यात सर्वसामान्यांच्या जीवनात सकारात्मक बदल घडविणाऱ्या विविध योजना राबविल्या जात आहेत. या योजना सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविण्यात शिक्षण विभाग आणि शिक्षकांचेही मोठे योगदान असल्याचे त्यांनी सांगितले.

उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले, सुसंस्कृत समाज घडविण्यासाठी शिक्षण हाच उपाय आहे. त्यामुळे शिक्षणाकडे भविष्याची गुंतवणूक म्हणून पाहणे गरजेचे आहे. पुरस्कार प्राप्त शिक्षकांचे काम बलशाली देश घडविण्यामध्ये सहाय्यभूत ठरले पाहिजे, तसेच इतर शिक्षकांसाठी प्रेरणादायी ठरले पाहिजे, असे सांगून यासाठी पुरस्कार प्राप्त शिक्षक राज्य शासनाचे ब्रँड अम्बॅसेडर ठरले पाहिजेत, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. शिक्षकांना दिलेल्या पुरस्कारांमुळे चांगल्या कामासाठी प्रोत्साहन मिळते असे सांगून शिक्षकांना यापुढील काळात स्वत:ला सतत अपडेट आणि अपग्रेड करीत रहावे लागणार असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले. विधानसभा अध्यक्ष ड.नार्वेकर यांनी नवीन प्रगतीशील भारत घडविण्यात शिक्षकांचा मोलाचा वाटा असल्याचे सांगून वाचायला शिकवणारा शिक्षक समाजाला घडवता आणि वाचवतो अशा शब्दांत शिक्षकांच्या कार्याचा गौरव केला. समाजात शिक्षकांना विशेष दर्जा असून विधान परिषदेत शिक्षकांच्या प्रतिनिधींसाठी राखीव जागा असल्याची माहिती त्यांनी दिली.

पुढची पिढी घडविण्याचे पवित्र कार्य शिक्षक करीत असतात. त्यांच्या कार्याचा गौरव करण्यासाठी पुरस्कार दिले जात असल्याचे सांगून शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांनी त्यांचे अभिनंदन केले. विद्यार्थी केंद्रबिंदू मानून शालेय शिक्षण विभाग काम करीत




आहे. यात शिक्षकांची भूमिका सवाग्रत महत्त्वाची असल्याचे सांगून शिक्षकांचे प्रलंबित प्रश्न लवकरात लवकर सोडविण्याचे शासनाचे धोरण असल्याचे श्री.केसरकर यांनी यावेळी सांगितले. जनगणना आणि निवडणुकीच्या कामाव्यतिरिक्त अन्य अशैक्षणिक कामे विभागाच्या परवानगीशिवाय लादले जाऊ नये यासाठी प्रधान सचिवांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात आली असून त्याचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर शासन याबाबत निर्णय घेईल, असे त्यांनी सांगितले. त्याचप्रमाणे शिक्षकांचे हेडकॉर्टर किती किमी अंतरापर्यंत असावे हे देखील लवकरच निश्चित केले जाणार असल्याची माहिती त्यांनी दिली. शाळांमध्ये पायाभूत सुविधा विकसित करण्यासाठी उद्योगांचा सामाजिक उत्तरदायित्व निधी वापरता येईल का याबाबत विभागामार्फत प्रस्ताव देण्यात आला असून शासनाची मान्यता मिळाल्यानंतर पाच ते दहा वर्षांसाठी शाळांमधील सुविधांच्या विकासाची जबाबदारी उद्योगांकडे देता येईल, असे त्यांनी सांगितले.शिक्षण आयुक्त सूरज मांढरे यांनी प्रास्ताविकाद्वारे शिक्षण प्रणालीत असलेले शिक्षकांचे महत्व अधोरेखित करून शिक्षक पुरस्कारासाठीच्या निवड प्रक्रियेची माहिती दिली.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinewsgmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

# पाताळेश्वर विद्यालयात डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन यांना अभिवादन




निफाड/प्रतिनिधी : पाडळी पाताळेश्वर माध्यमिक विद्यालयात अभ्यासपूरक उपक्रम व विदयार्थी संस्कारक्षम घडविण्यासाठी शालेय उपक्रमपूरक उपाययोजना सुरु राहण्यासाठी ५ सप्टेंबर शिक्षक दिन साजरा केला जातो. विविध उदाहरणे व अभ्यासपूरक साधनाची माहिती विद्यार्थी शिक्षकांनी या दिनाचे औचित्य साधून सांगितली.

माजी विद्यार्थी प्रदीप कडभाने,गणेश तांबे, अविनाश पाटोळे यांनी आपण शिक्षकांचे ज्ञानरूपी ऋण फेडण्यासाठी शिक्षकांचा सत्कार करण्यात आला. शालेय समितीचे चेअरमन चंद्रभान रेवगडे, सदस्य भगिरथ रेवगडे, पाडळी व आशापुर ग्रामस्थ च्या वतीने. गुरुजनांच्या प्रती त्यांचे सामाजिक ऋण फेड म्हणून प्रत्येक वर्षी ५ सप्टेबर दिनी आदर्श शिक्षक पुरस्कार देण्याचे निश्चित करून या वर्षीचा पुरस्कार विद्यालयाचे जेष्ठ शिक्षक श्री शिंगोटे एम.सी.यांना देण्यात आला. बाल विज्ञान विकास शिक्षण प्रसारक संस्थेचे सेक्रेटरी व विद्यालयाचे मुख्याध्यापक एस.बी.देशमुख यांचे हस्ते. विद्यार्थ्यांना ज्ञान देणाऱ्या गुरूंचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या प्रास्तविकेतून सौ.सविता देशमुख यांनी विद्यार्थ्यांना डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जीवनाचे पैलू उलगडून शिक्षक दिनाचे महत्व सांगितले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आर.व्ही.निकम व आभार , आर.टी.गिरी यांनी मानले. यावेळी बाल विज्ञान विकास शिक्षण प्रसारक संस्थेचे कोषाध्यक्ष व विद्यालयाचे शिक्षक टी.के.रेवगडे,बी.आर.चव्हाण,आर.व्ही.निकम,एस.एम. कोटकर, आर.टी.गिरी, एम.सी.शिंगोटे, एम.एम.शेख, सविता देशमुख,सी. बी.शिंदे,के .डी.गांगुर्डे, एस.डी.पाटोळे,आर. एस.ढोली,ए.बी.थोरे हे उपस्थित होते.

# साळमुख चौक येथे सकल मराठा समाजाच्या वतीने रास्ता रोको आंदोलन

माळशिरस/प्रतिनिधी : माळशिरस तालुक्यातील सोलापूर सातारा आणि सांगोला पुणे या महामार्गांना जोडणाऱ्या साळमुख चौक



या महत्त्वाच्या ठिकाणी मळोली, तांदूळवाडी, काळमवाडी, फळवणी आणि कोळेगाव येथील मराठा समाज बांधवांच्या वतीने जालना जिल्ह्यातील अंतरावली सराटी या गावात मराठा समाज बांधवांवर करण्यात आलेल्या गोळीबार व अमानुष लाठीमाराच्या निषेधार्थ रास्ता रोको आंदोलन करून निषेध नोंदवण्यात आला. यावेळी सरकारकडे मराठा समाजाच्या विविध मागण्यांचे निवेदन वेळापूर पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरिक्षक संजय राऊत यांना देण्यात आले. यावेळी फळवणी गावचे माजी उपसरपंच सचिन पाटील, संजय आवताडे, ज्योतीराम आवताडे, प्रशांत चव्हाण, हरिभाऊ डोंगरे, अमोल पाटील, शरद भोसले, विश्वास आवताडे, इत्यादी उपस्थित होते. तांदूळवाडीचे विद्यमान उपसरपंच विकास चव्हाण, रवींद्र दुधाट, नामदेव मिले, रणजीत कदम, सर्जेराव चव्हाण, कैलास काकडे, विलास कदम, शिवाजी चव्हाण, अध्यक्ष स्वाभिमानी शेतकरी संघटना बंडू दुधाट, अनिल शेळके आणि बहुसंख्य ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी कविराज जाधव फळवणीचे उपसरपंच सचिन पाटील, अनिल शेळके, आदींनी मनोगत व्यक्त केले.

# महावितरणाचा भोंगळ कारभार! नंदगाव चे नागरिक मात्र हैरान

नंदगाव/अजिंक्य मस्के : तुळजापूर तालुक्यातील नंदगाव येथे महावितरणच्या मनमानी कारभारामुळे व बेजबाबदारपणामुळे येथील वीजपुरवठा दिवसासह रात्री बे रात्री खंडित होत असून गावातील नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे.या बाबत अधिक माहिती अशी की बोरगाव येथील महावितरण कंपनीच्या सबस्टेशनहून नंदगाव येथे बीजपुरवठा होतो. परंतु गेल्या अनेक महिन्यांपासून महावितरण व कर्मचाऱ्यांच्या बेजबाबदारपणामुळे नंदगाव फिडरचा वीजपुरवठा वारंवार खंडित होत असून रात्री बेरात्री वीजपुरवठा खंडित होत असल्याने नागरिक वैतागले आहेत. दिवसाहि दहा ते पंधरा मिनिटाला लाईट ट्रिप होत असून व्होल्टेज कमी जास्त होत असल्याने वीज पुरवठा सुरळीत होत नाही.




परिणामी गावातील अनेकांच्या घरा- तील टिव्ही, फ्रिज, कुलर, फन, यासह घरगुती वापरण्यात येणाऱ्या इलेक्ट्रिक इलेक्ट्रॉनिक्स वस्तूच्या मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे.

मागील काही दिवसांपासून नंदगाव मध्ये वीज व्यवस्थित पुरवठा होत नसल्याने गाव रात्री अंधारामध्ये झोपण्याची वेळ येत आहे त्यामुळे नागरिकांमध्ये प्रचंड चीड निर्माण झाली आहे. सध्या पावसाळ्याचे दिवस असल्याने विद्युत पुरवठा सुरळीत सुरू ठेवणे गरजेचे आहे. पण महावितरणच्या ढिसाळ नियोजनामुळे वीज वारंवार खंडित होत असल्याचे प्रकार घडत आहेत. वीज वितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांनी घडत असलेला प्रकार त्वरित न थांबवल्यास नागरिकांचा उद्रेक होण्याची शक्यता नाकारता येत नाही. वीज वारंवार बंद होत असल्याने नागरिकांना विद्युत उपकरणे बंद ठेवावी लागत आहेत. पावसाळ्यामध्ये पिण्याचे पाणी मिळणेही मुश्कील झाले आहे. तसेच वेगवेगळे उद्योग असणाऱ्या दुकानदार व व्यावसायिकांचीही अडचण झाली आहे. एकूणच, सर्व कामकाजावर विपरीत परिणाम होत आहेत. अशा गंभीर मुद्द्याकडे महावितरणच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांकडून मात्र दुर्लक्ष होत आहे. अशा परिस्थितीत सर्वसामान्य नागरिकांना प्रचंड त्रासाला सामोरे जावे लागत आहे. मागील काही महिन्यांपासून गावात विजेचा लपंडाव सुरू आहे. महावितरणच्या अधिकाऱ्याच्या नियोजनाअभावी लोकांना त्रास सहन करावा लागत आहे. ग्राहकांसमोर मोठ्या समस्या उभ्या ठाकल्या आहेत. वेळेवर पाऊस नसल्यामुळे शेतकऱ्यांशी खूप मोठी हानी होत आहे आणि त्यातच विद्युत पुरवठा व्यवस्थित नसल्यामुळे शेतकरी वर्ग नाराज आहे.वरिष्ठ अधिकारी त्वरित गावातील समस्या सोडवण्यासाठी पुढाकार घेणे गरजेचे आहे.

# नळदुर्ग शहरात सेवानिवृत्त शिक्षक गुरुजनांचा शिवाचार्य महाराज यांच्या हस्ते सत्कार

## इतर शाळेवर सेवानिवृत्त शिक्षकानी लक्ष केंद्रित करण्याची गरज



नळदुर्ग/दादासाहेब बनसोडे: नळदुर्ग शहर एक ऐतिहासिक शहर म्हणून ओळखले जाते हे शहर क्रांतीकरकांचे शहर आहे या शहरातील या मातीतील नागरीकांनी मराठवाडा मुक्ती संग्रामासाठी प्राणांची आहुती दिली आशा स्वतंत्र्य सेनानी पुत्राची व सेवानिवृत्त शिक्षकांचा श्री ष . ब्र . बसवराजजी शिवाचार्य महाराज यांच्या शुभ हस्ते सत्कार करण्यात आला .

नुकताच नळदुर्ग शहरात शिक्षक दिनाचे औचित्य साधून शहरातील सेवानिवृत्त शिक्षकांचा सत्काराचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता . मुख्य अतिथी म्हणूनश्री.ष.ब्र. बसवराज शिवाचार्य महाराज ( शिवलिंगेश्वर मठ ) यांची उपस्थिती होती सुरुवातीला श्री.ष.ब्र.बसवराज शिवाचार्य महाराज यांच्या हस्ते हुतात्मा स्मारकाचे आणि सर्वपल्ली डॉ. राधाकृष्न सर्वपल्ली यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

त्यानंतर नळदुर्ग शहराच्या वतीने श्री.ष.ब्र.बसवराजजी शिवाचार्य महाराज यांच्या शुभ हस्ते सत्कार करण्यात यावेळी सेवानिवृत्त शिक्षक रामचंद्र मुळे,विजयकुमार यादगिरे,तानाजी जाधव, दगडू जाधव, गुरुनाथ मुळे,नेताजी गव्हाणे,वसंतराव अहंकारी,बलभीमराव मुळे, बाबुराव,पोतदार,सुभाष महाबोले, श्रीमती पाटील बाई, उत्तम रामदासी, बाळकृष्ण महाबोले,अच्युत रामदासी नंदकुमार जोशी, मोहन कुलकर्णी, उत्तम बनजगोळे, उपस्थित होते

यावेळी नळदुर्गचे माजी नगरध्यक्ष उदय जगदाळे माजी नगरसेवक कमलाकर चव्हाण माजी नगरसेवक महालिंग स्वामी माजी नगरसेवक सुधीर हजारे पत्रकार संघाचे अध्यक्ष सुहास येडगे जेष्ठ पत्रकार विलास येडगे शिवसेनेचे जिल्हा उपप्रमुख ज्ञानेश्वर घोडके सामाजिक कार्यकर्ते संजय विठ्ठल जाधव भाजपाचे शहराध्यक्ष धिमाजी घूगे भाजपा युवा मोर्चाचे जिल्हा सचिव श्रमिक पोतदार पत्रकार तानाजी जाधव पत्रकार दादासाहेब बनसोडे पत्रकार भगवंत सुरवसे सामाजिक कार्यकर्ते भीमाशंकर बताले .नारायण कनकदार.न.प.चे काळे उपस्थित होते या कार्यक्रमाचे आयोजन बलदेवसिंह ठाकूर यांनी केले होते .

यावेळी श्री.बलभीमराव मुळे गुरुजी आणि श्री.कमलाकर चव्हाण यांनी आपले मनोगत व्यक्त केले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन व आभार माजी नगरसेवक विनायक अंहकारी यानी मानले

# शिक्षकांना वंदन करून चपळगाववाडी येथे शिक्षक दिन साजरा




अक्कलकोट /प्रतिनिधीः जिल्हा परिषद प्राथमिक शाळा चपळगाववाडी येथे शिक्षक दिन साजरा करण्यात आला. चपळगाववाडी ग्रामस्थांनी आज शिक्षक दिनाचे औचित्य साधून जिल्हा परिषद प्राथमिक शाळा चपळगाववाडी मधील सर्व शिक्षकांचा शाल ,पुष्पगुच्छ व भेटवस्तू देऊन सन्मान केला. विद्यार्थ्यांनी शिक्षकांना स्वहस्ते तयार केलेले भेटकार्ड देऊन वंदन केले.प्रत्येक व्यक्तीच्या आयुष्यात शिक्षकांचे स्थान अत्यंत महत्त्वाचे असते .गुरुमुळे ज्ञान प्राप्ती होते, जीवनातील अनेक अनुभव मिळतात व आयुष्याला आकार मिळतो ,घराघरात संस्कार रूजविले जातात असे मत सेवानिवृत्त शिक्षक श्री विरुपाक्षप्पा दोड्याळे सर यांनी व्यक्त केले. अनेक विद्यार्थ्यांनी शिक्षकांबद्दल माहिती सांगत गौरवोद्गार काढले. यावेळी अध्यक्ष श्री गौरीशंकर दोड्याळे यांनी गावाने स्वयंप्रेरणेने प्रतिवर्षी शिक्षक दिनाच्या निमित्ताने शिक्षकांचा सत्कार करण्यात येतो ती प्रथा आजही चालू असल्याचे सांगितले. प्रारंभी क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले व माजी राष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेचे पूजन श्री नागनाथ कोरे व श्री विरुपाक्षप्पा दोड्याळे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी गावातील श्री रेवणसिध्देश्वर सार्वजनिक वाचनालया च्या वतीने शालेय विद्यार्थ्यांना ५१ संच बालसाहित्य पुस्तके भेट देण्यात आली. यावेळी शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष श्री गौरीशंकर दोड्याळे, उपाध्यक्ष करीम नदाफ, माजी अध्यक्ष श्री मुलका नदाफ,ग्रामसेविका गायकवाड मॅडम सिकंदर नदाफ, वसीम नदाफ,चाँद नदाफ, ,शशिकांत स्वामी, चिदानंद निंबाणे,श्रीशैल मटगे, मल्लिनाथ शिवशेट्टी, मुख्याध्यापक श्री शिवशरण गोविंदे, सहशिक्षक तुकाराम जाधव सर,

अंगणवाडी सेविका मंगल गोविंदे, मदतनीस आश्विनी माशाळकर, ज्योती गोविंदे, बहुसंख्य पालक, विद्यार्थी व ग्रामस्थ उपस्थित होते.

# अनंत चैतन्य माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रशाला, हन्नूर येथे शिक्षक दिन साजरा



अक्कलकोट/प्रतिनीधी : अक्कलकोट तालुक्यातील अनंत चैतन्य माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रशाला , हन्नूर येथे डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जयंतीचे औचित्य साधून शिक्षक दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला .कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रशालेचे माजी प्राचार्य श्री सिद्धेश्वर कल्याण शेट्टी सर हे होते तर प्रमुख उपस्थिती म्हणून प्रशालेचे मुख्याध्यापक श्री विलास बिराजदार व सर्व शिक्षक बंधू भगिनी व शिक्षकेत्तर कर्मचारी हे होते .प्रारंभी माजी राष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन व संस्थेचे संस्थापक अध्यक्ष कै. पंचप्पा कल्याण शेट्टी सर यांच्या प्रतिमेचे पूजन प्रशालेचे माजी प्राचार्य श्री सिद्धेश्वर कल्याण शेट्टी सर यांच्या हस्ते करण्यात आले व त्यानंतर सामूहिक अभिवादन करण्यात आले

दरवर्षी डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा जन्मदिवस संपूर्ण भारतात ५ सप्टेंबर रोजी शिक्षक दिन म्हणून साजरा करण्यात येतो आज प्रशालेतील इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष अध्यापनाचे अनुभव घेत शिक्षकांची ,शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची व लिपिकांची भूमिका अत्यंत व्यवस्थितपणे बजावत इयत्ता पाचवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांना अध्यापन केले त्याचबरोबर दिवसभर प्रशालेचे कामकाजही त्यांनीच सांभाळले यावेळी डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जीवन कार्याची महती प्रशालेचे ज्येष्ठ शिक्षक श्री शहाजी माने सर व दहावीच्या विद्यार्थ्यांनी सांगितले यावेळी इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांकडून शिक्षक दिनानिमित्त प्रशालेतील सर्व गुरुजनांचे पुष्पगुच्छ देऊन कृतज्ञता व्यक्त करीत सन्मान करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कुमारी सानिका मंगरूळे व आभार कुमारी अंजली रोटे या विद्यार्थिनींनी मानले.

# सैनिक वेल्फेअर असोसिएशन कडून शिक्षकांचा सत्कार




टाकळीवाडी/नामदेव निर्मळे: टाकळीवाडी तालुका शिरोळ येथील जिल्हा परिषद शाळा कुमार विद्या मंदिर व श्री सरस्वती हायस्कूल शाळेतील मुख्याध्यापक सर्व शिक्षिका,

शिक्षक यांचा शिक्षक दिनानिमित्त सैनिक असोसिएशन तर्फे सत्कार करण्यात आला. टाकळीवाडी गावातील माजी सुभेदार व विद्यमान तंटामुक्त चे अध्यक्ष केंदबा कांबळे, सैनिक वेल्फेअर असोसिएशनचे रमेश निर्मळे, दादा खोत तसेच संपूर्ण सैनिक वेल्फेअर असोसिएशन हे नेहमीच शिक्षकांच्या व शाळेच्या पाठीशी उभे असतात.

टाकळीवाडीतील सर्व शाळेतील शिक्षक, शिक्षिका यांच्यामुळे गावकऱ्यांची एक मान उंचावली आहे. या शिक्षकांच्या मुळे गावातील शाळेतील विद्यार्थी जिल्हा स्तरावर वैयक्तिक , सांस्कृतिक, कुस्ती ,व प्रज्ञाशोध मध्ये झळकलेले आहेत. शिक्षकांचे आपल्यावर कुठेतरी उपकार आहेत. त्याची जाणीव ठेवून सर्व शिक्षक, शिक्षिका यांचा सत्कार करण्यात आला. शिक्षक दिनाच्या भरभरून शुभेच्छा देण्यात आल्या. शिक्षकांचे सुद्धा प्रेमळ साथ लाभत आहे.

# युनायटेड इंडिया इन्शुरन्स कंपनी यांच्यामार्फत श्री सरस्वती हायस्कूल शाळेमध्ये शुद्ध पाणी फिल्टर भेट

टाकळीवाडी/नामदेव निर्मळे : टाकळीवाडी तालुका शिरोळ येथील श्री सरस्वती हायस्कूल शाळेमध्ये मुलांना शुद्ध पाणी पिण्याची सोय नव्हती. शुद्ध पाणी नसल्यामुळे अनेक विद्यार्थी, विद्यार्थिनी ,आजारी पडत होते.

याची दखल घेऊन युनायटेड इंडिया इन्शुरन्स कंपनी जयसिंगपूर व इचलकरंजी शाखा यांच्या वतीने १ तासामध्ये ५० लिटर पाणी फिल्टर करणारा शुद्ध पेजल देण्यात आला.

विशेष सहकार्य मा.महेश कांबळे साहेब युनायटेड इंडिया इन्शुरन्स कंपनी जयसिंगपूर चे मॅनेजर यांचे मोलाचे सहकार्य लाभले. यावेळी युनायटेड इंडिया इन्शुरन्स कंपनीचे विभागीय प्रबंधक इचलकरंजी शाखेचे मा. स्वप्निल मदने साहेब यांचा विशेष सत्कार करण्यात आला. तसेच जयसिंगपूर विभागीय प्रशासकीय अधिकारी मा.अमित शिंगे साहेब यांचा सुद्धा सत्कार करण्यात आला. तसेच सुभाष काळूगडे, अनिल



कोळी, तेजस ठोमके, तसेच जयसिंगपूर शाखा व इचलकरंजी शाखा यांचे सर्व विमा प्रतिनिधी यांचा सत्कार करण्यात आला. पाणी फिल्टर चे उद्घाटन मा. स्वप्निल मदने व अमित शिंगे साहेब यांच्या हस्ते करण्यात आले. सर्वत्र युनायटेड इंडिया इन्शुरन्स कंपनीचे कौतुक होत आहे. मुलांच्या चेहऱ्यावर सुद्धा एक प्रकारचा आनंद दिसून येत होता. यावेळी शाळा समिती व्यवस्थापन चे अध्यक्ष, सर्व सदस्य, मुख्याध्यापक सर्व शिक्षिका, शिक्षक ,विद्यार्थी, विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# वेळापूर मधील जि.प. शाळेत लावला बेकायदेशीर व्यावसायिक फलक..


वेळापूर/प्रतिनिधी:वेळापूर ता. माळशिरस येथील बस स्टँड शेजारी असलेल्या जिल्हा परिषद मुलांच्या शाळेच्या मैदानावर आणि प्रथमदर्शनी जागेत कोणतीही परवानगी न घेता व्यावसायिक जाहिरात झळकवलेला फलक लावण्यात आला आहे. अकलूज ता. माळशिरस येथील किया या वाहन उत्पादन कंपनीच्या सेलिब्रेट किया या अधिकृत डीलर मार्फत हा बोर्ड लावल्याचे त्या फलकावरून दिसते आहे.




याबाबत बोर्डवर दिलेल्या मोबाईल नंबर वरती फोन करून या प्रकाराबाबत विचारणा केली असता. जाहिरात एजन्सी ने तो बोर्ड लावला असल्याचे सांगण्यात आले, संबंधित शोरुम कडूनच संबंधित व्यक्तीचा फोन नंबर देण्यात आला. त्यावर फोन करून याबाबत ग्रामपंचायत वेळापूर किंवा जिल्हा परिषद शाळा वेळापूर यांची आपण परवानगी घेतली आहे का? अशी विचारणा केली असता आपल्याकडे तशी कोणतीच परवानगी नसल्याचे त्या व्यक्तीने फोनवर सांगितले आहे. अशा प्रकारची कोणतीही व्यावसायिक जाहिरात सरकारी जागेत लावण्यासाठी संबंधित शासकीय विभाग किंवा स्थानिक ग्रामपंचायतीची परवानगी घेणे गरजेचे असते परंतु तशी कोणतीही परवानगी घेतली नसल्याने ग्रामपंचायत वेळापूर हद्दीत सर्व काही आलबेल सुरू आहे, कोणी ही यावे मन मर्जी करून जावे असा प्रकार सुरू असल्याची चर्चा वेळापूर ग्रामस्थ करताना दिसत आहेत. ग्रामपंचायत प्रशासनाने या बेकायदेशीर प्रकाराकडे गंभीरपणे लक्ष घालावे व योग्य ती कारवाई करावी अशी मागणी सुद्धा स्थानिकांमधून होत आहे.

# शिक्षक हेच सुजाण नागरिक निर्माण करून समाज व देश घडवू शकतात : आ.सचिन कल्याणशेट्टी

अक्कलकोट/प्रतिनिधी : शिक्षक हेच सुजाण नागरिक निर्माण करून समाज व देश घडवू शकतात तसेच ज्ञानाच्या जोरावर यशाची उंच भरारी घेऊन शिक्षकांनी व विदयार्थ्यांनी आपल्या तालुक्याचे नाव उज्वल करावे असे आवाहन संस्थेचे अध्यक्ष,कर्तृत्ववान आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी केले. ते महर्षि विवेकानंद समाजकल्याण संस्थेच्या सौ. सुरेखा कल्याणशेट्टी माध्य. व उच्च माध्यमिक मराठी व सेमी इंग्रजी विद्यालय ,मातोश्री गुरुबसव्वा कल्याणशेट्टी महाविद्यालय, गिरीजामाता प्राथमिक मराठी व सेमी इंग्रजी विद्यालय या सर्व शाखेच्यावतीने आयोजित केलेल्या शिक्षक दिनाच्या कार्यक्रमात बोलत होते. या कार्यक्रमास प्रमुख आथिती म्हणून जेष्ठ संचालक मल्लिनाथ कल्याणशेट्टी, संचालिका सौ शांभवी कल्याणशेट्टी,सीईओ सौ रुपाली शहा, संचालक मल्लिनाथ मसुती, ज्युनियर विभाग प्रमुख सौ पूनम कोकळगी,प्राचार्य डॉ राजेंद्रसिंह लोखंडे सेवानिवृत्त प्राचार्य बापुजी निंबाळकर, सेवानिवृत्त पर्यवेक्षक शिवानंद पुजारी, प्राचार्य मलकप्पा भरमशेट्टी आदी उपस्थित होते. यावेळी मान्यवरांच्या हस्ते प्रतिमा पूजन करण्यात आले. तसेच सर्व मान्यवरांचा व शिक्षकांचा सत्कार विदयार्थ्यांकडून करण्यात आला. याप्रसंगी विदयार्थ्यांची भाषणे झाली. या अगोदर इयत्ता १० वी च्या विद्यार्थ्यांनी शिक्षकाची भूमिका बजावताना आलेले अनुभव आपल्या मनोगतातून व्यक्त केले. यावेळी डॉ राजेंद्रसिंह लोखंडे यांचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन लाभले.



या कार्यक्रमास प्राथमिकचे मुख्याध्यापक सुरेश आवटे, विद्यार्थ्यांमधील मुख्याध्यापक कु. स्फुर्ती खराडे, नितीन भालेराव, खंडेराव घाटगे, सर्व प्राध्यापक,शिक्षक ,पालक तसेच बहुसंख्य विद्यार्थी कर्मचारीवर्ग उपस्थित होते.

# समता माध्यमिक विद्यालयात विद्यार्थीच झाले शिक्षक– शिक्षिका शिक्षक दिनानिमित्त घेतला गुरू कार्य अनुभव

येवला/प्रतिनिधीः मानवी जीवनात गुरुचे महत्व अनन्यसाधारण आहे गुरु शिवाय मानवाचा जीवन उद्धार अशक्य आहे.तालीम से तरक्की या उक्तीप्रमाणे शिक्षणातून खरी उन्नती होते शिक्षणाचे महत्त्व महात्मा फुले दांपत्याने १८४८ भारतात पहिली मुलींची शाळा काढून सिद्ध केले व तदनंतर तो आदर्श पुढे घेऊन डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांनी उच्च विद्या विभूषित होऊन शिक्षकी पेशा केला व देशाचे बहुमोल असे पद ही स्वीकारले एक शिक्षक व्यक्ती म्हणून स्वतः तर घडतोच पण तो अनेक पिढ्या घडवत असतो हा आदर्श सर्वपल्ली राधाकृष्णन यांनी आपल्या जीवन कार्यातून दिला.




राधाकृष्णन यांचे स्मरण म्हणून देशभर आज त्यांची जयंती शिक्षक दिन म्हणून साजरी झाली. समता प्रतिष्ठान येवला संचलित समता माध्यमिक विद्यालयातही आज इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांची विद्यार्थ्यांनी गुरु ज्ञानदानाचा अनुभव घेतला. येथील विद्यार्थी विद्यार्थिनी यांनी इयत्ता पाचवी ते नववीच्या विद्यार्थ्यांना वेगवेगळ्या विषयाचे ज्ञानदान कार्य केले. शिक्षकाची भूमिका कार्य आत्मसात करण्याचा प्रयत्न केला. शाळेतील अविभाज्य घटक असलेले शिक्षकेतर कर्मचारी ही विद्यार्थीच बनले होते. वेगवेगळ्या विषय अध्यापनाबरोबरच वेगवेगळे खेळ प्रात्यक्षिक गणिती क्रिया विज्ञान प्रयोग पर्यावरण शिक्षण चांद्रयान याविषयीची अद्यावत माहिती विद्यार्थी शिक्षकांनी आज आपल्या शाळेतील विद्यार्थी भावा बहिणींना करून दिली. शिक्षक दिनाचे औचित्य साधून प्रथम समता माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक जी. एल.जाधव यांनी सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेचे पुष्पहार अर्पण करून प्रतिमा अभिवादन केले.

उत्कर्ष वाघ,तुळसी वेताळ यांनी विद्यार्थी मुख्याध्यापक–मुख्याध्यापिका म्हणून कामकाज पाहिले.साक्षी शिर्के,सुवर्णा कुऱ्हे कोमल मोरे,कोमल गायके,श्रद्धा गायके,वैष्णवी भदाने,तैजीबनज शाह,दीपाली जाधव,मोनालि सोमासे,तमीम शाह,मंथन आरखडे,काजल गायके,गायत्री पवार,प्रगति गायके ,उमयमा शाह,जिया शाह ,ऋतुजा मगर,संद्या बागुल

शाळेचे शिक्षक हरिभाऊ सोनवणे मार्गदर्शन केले.,शरद शेजवळ,हरिभाऊ भागवत,विनोद सोनवणे,हिरामण पवार,बाबासाहेब गोविंद व शिक्षकेत्तर कर्मचारी ज्ञानेश्वर झाल्टे,लक्ष्मण दाणे यांचे सहकार्य लाभले. समता माध्यमिक विद्यालयाच्या सर्व विद्यार्थी विद्यार्थिनींनी प्रचंड उत्साहात शिक्षक दिनाच्या कार्यक्रमात सहभाग घेतला.

# वादळी वाऱ्याने नुकसान झालेल्या पडघा विभागातील नागरीकांना अद्याप भरपाई नाही

भिवंडी/मिलिंद जाधव : वादळी वाऱ्याने घंराचे नुकसान झालेल्या पडघा विभागातील नागरीकांना शासनाकडून अद्याप नुकसान भरपाई मिळाली नाही.३० मे रोजी अवकाळी पावसांसह अचानक आलेल्या वादळी वाऱ्याने पडघा विभागातील पडघा, बोरीवली, कुंभारशिव, राहुर, वाफाळे, दळेपाडा, कुरुंद, देवळी, गावातील नागरिकांच्या घरावरील कौले, पत्रे, संपूर्ण छप्पर उडुन घरातील जिवनावश्यक सामानासह, वस्तू, धान्य भिजुन मोठे नुकसान झाले होते

तसेच परिसरातील शांळाचेही संपूर्ण छप्पर उडाल्याने मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते सर्वात जास्त नुकसान वाफाळे गावातील घंराचे झाले होते. या वादळी वाऱ्यामुळे काही नागरीक जखमी झाले होते. तर या वादळी वाऱ्याची तिव्रता बघता स्थानिक महसुल विभागाने नागरीकांना नुकसान भरपाई मिळावी म्हणून त्वरीत पंचनामे करून अहवाल शासनाकडे सादर केला होता. तसेच नुकसानग्रस्त गांवाना खासदार कपील पाटील आमदार शांताराम मोरे यांनी पाहणी करून नुकसानीचे पंचनामे करून शासनाने त्वरीत नागरीकांना नुकसान भरपाई देण्याच्य सुचना केल्या होत्या परंतु तिन महीने उलटूनही अद्याप नुकसान भरपाई मिळाली नसल्याने नागरीक हवालदिल झाले आहेत. खासदार ,आमदार यांनी नुकसानग्रस्त भागाची पाहणी करून नुकसान भरपाई साठी अधीकाऱ्यांना सुचना देऊनही शासनाकडून अद्याप नुकसान भरपाई मिळाली नाही. असे कुणबी सेना भिंवडी तालुका अध्यक्ष भगवान सांबरे यांनी बोलताना सांगितले.

# जगदगुरू पंचाचार्य प्रशालेत शिक्षक दिन साजरा



अक्कलकोट/प्रतिनिधीः गौडगाव बु!! येथील श्री गुरुसिद्ध मल्लेश्वर कल्याण केंद्र संचलित श्री जगदगुरू पंचाचार्य प्रशालेत शिक्षक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. तत्पुर्वी भारताचे माजी राष्ट्रपती,थोर तत्त्वज्ञानी,भारतरत्न डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जयंती निमित्त प्रशालेचे मुख्याध्यापक कल्याणी देशेट्टी व सर्व शिक्षकांच्या हस्ते डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी इयत्ता दहावी वर्गातील विद्यार्थ्यांकडून सर्व शिक्षक व शिक्षकेतर सेवक वर्गाचे प्रत्येकी भेटवस्तू व गुलाब पुष्प देऊन गौरविण्यात आले. यावेळी कुमारी धावणे कु.चव्हाण यांनी आपल्या शिक्षका विषयी आधारभाव व्यक्त केली. सहशिक्षक महेश स्वामी, परमेश्वर हसुरे यांनी शिक्षक दिनानिमित्त आपले मनोगत व्यक्त केले.कार्यक्रमाचे अध्यक्ष मुख्याध्यापक कल्याणी देशेट्टी यांनी डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन. यांच्या कार्याचा आढावा घेतला आणि सर्वांना शिक्षक दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा दिले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी तसेच इयत्ता दहावी विद्यार्थ्यांचे सहकार्य लाभले. कु श्रीविका खानापुरे यांनी सूत्रसंचालन केले तर कु. चैत्राली मेत्रे यांनी सर्वांचे आभार मानले.

# सरकारने आमच्या मागण्या मान्य करूनच पंढरीत यावे

## पंढरीतील सर्वपक्षीय शेतकरी आक्रोश मोर्चामध्ये चेअरमन अभिजीत पाटील यांची मागणी




### आता चेअरमन काळे यांच्या घरावरही काढावा लागेल मोर्चा

विविध प्रश्नासाठी श्री विठ्ठलचे चेअरमन अभिजीत आबा पाटील यांच्या नेतृत्वाखाली पंढरपूर तहसिलवर मोर्चा काढण्यात आला.यावेळी अनेकांची भाषणे झाली. यामध्ये सहकार शिरोमणीचे माजी संचालक ड.दिपक पवार यांनी आपल्या भाषणात एवढ्या दिवसात बिले न दिलेल्या चेअरमन कल्याणराव काळे यांच्या घरावरही आता आपणाला लवकरच यापुढील काळात मोर्चा काढावा लागेल. असे सांगत, त्या सहकार शिरोमणी चे थकीत बिलाचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आणला आहे.– **ॲड.दिपक पवार**

पंढरपूर/प्रतिनीधी : सोलापूर जिल्ह्यातील शेतकरी आणि विविध घटक यांच्या विविध प्रश्नाची सोडवणूक शासनाने करावी यासाठी यासाठी सोमवारी येथील तहसील कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला होता. श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते अभिजीत पाटील यांच्या नेतृत्वाखाली हा सर्वपक्षीय आणि विविध संघटनेचे वतीने तहसीलदार यांना निवेदन सादर करण्यात आले.यावेळी देण्यात आलेल्या निवेदनात खालील मागण्या देण्यात आल्या आहेत. यामध्ये पंढरपूर, मंगळवेढा तसेच सोलापूर जिल्ह्यात दुष्काळ जाहीर करावा. उजनी धरणातून भीमा नदी उजव्या व डाव्या कालव्यात पाणी सोडावे. वीर धरणातून पाणी सोडून सोनके तलाव पूर्ण क्षमतेने भरून घेण्यात यावा तसेच टेल टू हेड पाणी मिळावे. चारा डेपो सुरू करून जनावरांना चारा उपलब्ध करून द्यावा.दुधाला विना कपात ३८ रुपये दर द्यावा. शिक्षण व नोकरीमध्ये मराठा समाजाला कायमस्वरूपी आरक्षण मिळावे. जालना येथील मराठा आरक्षण मागणीसाठी उपोषणाला बसलेल्या आंदोलकावर झालेल्या लाठी चार्जची उच्चस्तरीय चौकशी व्हावी व त्या आंदोलकांवरील गुन्हे मागे घ्यावे. हा मोर्चा छत्रपती शिवाजी महाराज चौक ते तहसील कार्यालय, येथे मोठ्या संख्येने जनसमुदाय उपस्थित काढण्यात आला. मोर्चाचे रूपांतर सभेमध्ये झाले. यावेळी चेअरमन अभिजीत पाटील यांनी आपल्या भाषणात वरील मागण्या मांडत सरकारला या मागण्या मान्य करण्यासाठी सर्वांनी मिळून भाग पाडू असे सांगितले. येत्या १०तारखेला शासन आपल्या दारी येत आहे. त्यामधे जनतेची कामे मार्गी लावूनच आपल्या दारी यावे अशीही मागणी केली.

यावेळी स्वेरी कॉलेजचे संस्थापक अध्यक्ष बी.पी.रोंगेसर, काँग्रेस पक्षाचे मा.जिल्हाध्यक्ष देवानंद गुंड पाटील, ज्येष्ठ विष्णूभाऊ बागल, पांडूरंग कारखान्याचे मा.व्हा चेअरमन आप्पासाहेब जाधव, बाळासाहेब कौलगे, बिभिषन पवार, शशिकांत पाटील, राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष सुधीर भोसले, काँग्रेस पक्षाचे, काँग्रेसचे तालुकाध्यक्ष हनुमंत मोरे, शिवसेना ठाकरे गटाचे रणजीत बागल, स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष तानाजी बागल, तालुकाध्यक्ष सचिन पाटील, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे संदीप मांडवे, काँग्रेसचे शहराध्यक्ष अमर सूर्यवंशी, शेतकरी संघटनेचे कार्याध्यक्ष सचिन आटकळे, राष्ट्रवादी मंगळवेढा तालुकाध्यक्ष चंद्रशेखर कोंडूभैरी, मुझमिल काझी, राष्ट्रवादी किसान सेलचे अध्यक्ष शुभांगी जाधव, राजश्री ताड, श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे सर्व संचालक यांसह मोठ्या संख्येने शेतकरी बांधव सर्व पक्षाचे पदाधिकारी उपस्थित होते.




महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाच्या वतीने जळगाव जिल्ह्यातील पाचोरा येथे रविवार दि.३ सप्टेंबर २०२३ रोजी २०२३ खानदेश विभागातील पत्रकारांना, विमा, रेनकोट छत्री वाटप आणि विविध पुरस्कारांचे वितरण मदत व पूनर्वसन मंत्री अनिल पाटील, आमदार किशोर पाटील यांच्या हस्ते आणि पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांच्या अध्यक्षतेखाली झाले.यावेळी पत्रकार संघाचे सरचिटणीस विश्वास आरोटे, कार्यकारिणी सदस्य बाबा देशमाने,उत्तर महाराष्ट्र अध्यक्ष प्रवीण सपकाळे, आयोजक किशोर रायसाकडा, प्रमोद सोनवणे व मोठ्या प्रमाणात पत्रकार पदाधिकारी उपस्थित होते.



पंढरपूर तालुक्यातील खर्डी येथील येस स्वराज्य फिटनेस क्लब च्या उद्घाटन प्रसंगी आपले लाडके आमदार श्री समाधान दादा अवताडे साहेब हे उपस्थित राहून फित कापून क्लबचे उद्घाटन केले.सदर प्रसंगी श्री. विजयसिंह दादा देशमुख श्री मोहन आप्पा बागल श्री. दिपक दादा वाडदेकर,श्री. दत्ता यादव अध्यक्ष,श्री.दत्ता आबा रोंगे –पाटील,श्री.दत्ता आबा पाटील,श्री.देवा भाऊ रोंगे,श्री प्रसाद भैया कळसे,श्री. भास्कर तात्या जगताप,श्री सुनील रणदिवे श्री बिबीशन ताड, भाऊसाहेब आगवणे शुभम यादव संतोष कांबळे पांडुरंग गिनाजी रोंगे, दत्तात्रेय पारेकर, तानाजी पाटील,बालाजी टिंगरे,भैया चंदनशिवे, व इतर मान्यवर उपस्थित होते.